आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२४ नोव्हेंबर २०२५ - सोमवार

**ठळक बातम्या**

- देशाचे ५३ वे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांचा शपथविधी

- मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजपचे ४० टक्के उमेदवार तरुण वर्गातले असतील, अशी मुख्यमंत्र्यांची ग्वाही

- सशस्त्र संघर्ष सोडून मुख्य धारेत येण्याची इच्छा व्यक्त करुन १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सुरक्षा दलांची कारवाई स्थगित करावी अशी  नक्षलींची मागणी

- सहावी आंतरराष्ट्रीय कृषीशास्त्र काँग्रेस आजपासून नवी दिल्ली इथं सुरु

**आणि**

- प्रसिद्ध अभिनेता धर्मेंद्र याचं निधन/ मुंबईत अंत्यसंस्कार

**<><><><><>**

देशाचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून आज न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी शपथ घेतली. नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पदाची शपथ दिली. उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिरला, तसंच केंद्रीय मंत्रिमंडळाचे सदस्य यावेळी उपस्थित होते. न्यायमूर्ती सूर्यकांत संवैधानिक, आणि दिवाणी कायदेक्षेत्रातले तज्ज्ञ असून २०१९ पासून  सर्वोच्च न्यायालयात न्यायदान करत आहेत. सरन्यायाधीशपदाचा त्यांचा कार्यकाळ १५ महिन्यांचा असेल.

मावळते सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई काल सेवानिवृत्त झाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दक्षिण आफ्रिकेचा दौरा यशस्वीपणे आटोपून मायदेशी परतले. जोहान्सबर्ग जी-20 शिखर परिषदेच्या तिसऱ्या सत्रात त्यांनी काल सांगितलं की, तंत्रज्ञान हे मानवकेंद्रित, जागतिक आणि मुक्त स्त्रोतावर आधारित असायला हवं, 'सर्वांसाठी समन्यायी भविष्य - अत्यावश्यक खनिजं, योग्य काम आणि कृत्रिम बुद्धिमत्ता' या संकल्पनेवर हे सत्र आधारित होतं.

**<><><><><>**

तरुणाईच्या माध्यमातून समाजात आणि राजकारणात परिवर्तन शक्य असल्याचं सांगत आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजपचे ४० टक्के उमेदवार हे तरुण असतील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुंबईत आयोजित आयआयएमयूएन मुंबई-२०२५ या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांनी युवावर्गाशी संवाद साधला. यावेळी युवावर्गासाठीच्या अनेक योजना आणि मुंबईतल्या महत्त्वाच्या प्रकल्पांविषयी मुख्यमंत्र्यानी माहिती दिली.

मुंबईत वाहतुकीचं मोठं जाळं तयार करण्यात सरकारला यश आलं असून पुढच्या पाच ते सात वर्षात मुंबईचा संपूर्ण कायापालट करण्याचं उद्दिष्ट आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. मुंबईतली गर्दी कमी करण्यासाठी पाताललोक म्हणजे भुयारी मार्गांचं मोठं जाळं तयार करण्य़ात येणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. हे सर्व प्रकल्प २०३२ पर्यंत पूर्ण होतील अशी ग्वाही त्यांनी या कार्यक्रमात दिली. विशेषतः मुंबईची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या उपनगरीय रेल्वे ही कोणतीही भाडेवाढ न करता संपूर्णपणे वातानुकूलित आणि बंद डब्यांची केली जाणार आहे. याशिवाय, स्वच्छ पर्यावरण, अधिक मोकळ्या जागांसाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात आल्याचंही मुख्यमंत्री म्हणाले.

मुख्यमंत्री इंटर्नशीप योजनेमुळे अनेक तरुणांना रोजगार मिळण्यासाठी मदत झाली, ही योजना राज्यात यशस्वी झाली , त्यामुळे इतर राज्यं सुद्धा ही योजना राबवत आहेत, असं मुख्यमंत्री म्हणाले.

- **- होल्ड बाईट मुख्यमंत्री - -**

- **<><><><><>**

शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकार एकात्मिक शेतीवर भर देत असल्याचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी सांगितलं. नवी दिल्लीत आयोजित ६व्या आंतरराष्ट्रीय ॲग्रोनॉमी काँग्रेसचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. कृषी आधारित अर्थव्यवस्थेत शेतीच्या बरोबरीने इतर उत्पादनांवर भर दिला जातो. शेती अधिक फायदेशीर व्हावी म्हणून शेती तज्ज्ञांनी संशोधन करावं असं आवाहन त्यांनी केलं. ३ दिवस चालणाऱ्या ॲग्रोनॉमी काँग्रेसमधे विविध मार्गदर्शनपर व्याख्यानं, चर्चासत्र, नवीन संशोधनविषयक प्रदर्शनं इत्यादी आयोजित केली आहेत.

<><><><><>

सशस्त्र संघर्ष सोडून मुख्य धारेत येण्याची आपली इच्छा असून १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सुरक्षा दलांची कारवाई स्थगित करावी अशी मागणी करणारं पत्रक नक्षली संघटनेच्या एमएमसी झोन अर्थात महाराष्ट्र-मध्यप्रदेश-छत्तीसगड प्रदेश समितीने तिन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या नावे जारी केलं आहे. अनंत नावाने नक्षली प्रवक्त्याने हे पत्रक जारी केलं आहे. सशस्त्र संघर्षाला विराम देण्याची आपली इच्छा असून आपसात संवाद साधण्यासाठी फेब्रुवारी पर्यंतची वेळ हवी असल्याचं या पत्रकात म्हटलं आहे. बस्तर भागातील नक्षली कमांडर हिडमा मडावी याचा सुरक्षा दलाच्या कारवाईत नुकताच मृत्यू झाला, त्यानंतर नक्षलींकडून हे पत्रक जारी जालं आहे.

<><><><><>

केंद्रीय वाणिज्य आणि  उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी इस्रायलच्या तीन दिवसीय अधिकृत दौऱ्याचा समारोप करताना इस्रायलचे राष्ट्रपती आयझॅक हर्झोग तसंच प्रधानमंत्री बेंजामीन नेतन्याहू यांची भेट घेऊन चर्चा केली. या दोन्ही बैठकींमध्ये भारत-इस्रायल सामरिक भागीदारी अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात आला. इस्रायलचे राष्ट्रपती हर्झोग यांच्या भेटीत व्यापार आणि गुंतवणूक, विज्ञान-तंत्रज्ञान, नवोपक्रम, तसेच व्यापक आर्थिक सहकार्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. तर  प्रधानमंत्री  नेतन्याहू यांच्या भेटीत दोन्ही नेत्यांनी व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, संरक्षण, शेती, पाणी व्यवस्थापन आणि नवोपक्रम क्षेत्रांमधे सहकार्य वाढवण्यावर चर्चा करण्यात आली.

<><><><><>

सुप्रसिद्ध अभिनेता धर्मेंद्र यांचं आज निधन झालं. ते ८९ वर्षांचे होते.  काही दिवसांपूर्वी त्यांना प्रकृतीअस्वास्थ्यामुळे रुग्णालयात दाखल केलं होतं. मात्र, उपचारांनंतर त्यांना घरी सोडण्यात आलं होतं. आज त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर मुंबईत पवनहंस स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांच्या कुटुंबियांसह निकटवर्तीय उपस्थित होते.

६५ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत ३०० हून जास्त चित्रपटांमधे भूमिका करणारे धर्मेंद्र यांनी १९६० मधे दिल भी तेरा हम भी तेरे या चित्रपटातून रुपेरी पडद्यावर पदार्पण केलं. देखणं रुबाबदार व्यक्तिमत्व आणि संवेदनशील चेहरा या वैशिष्ट्यांच्या बळावर धर्मेंद्र यांनी

कविमनाच्या रोमँटिक नायकाच्या भूमिका साकारल्या, तसंच ॲक्शन हिरोच्या भूमिकांमुळे ते हिंदी चित्रपटसृष्टीचे 'ही मॅन' म्हणून प्रसिद्ध झाले. अभिनयात विनोदाची डूब देणारा त्यांचा नायकही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला.

बंदिनी, हकिकत, शोले, गुड्डी, सीता और गीता, लोफर, यादों की बारात, चुपके चुपके, शोले, चाचा भतीजा, द बर्निंग ट्रेन, इन्साफ का तराजू, राम बलराम अशा अनेक गाजलेल्या चित्रपटांमधे त्यांनी भूमिका साकारल्या होत्या. आगामी इक्कीस या चित्रपटातही त्यांची भूमिका आहे.

काही बंगाली आणि पंजाबी चित्रपटातही त्यांनी काम केलं होतं. छोट्या पडद्यावरही त्यांनी अनेक लोकप्रिय कार्यक्रमांमधे भाग घेतला. बॉलिवुडमधल्या कामगिरीबद्दल त्यांना फिल्मफेअरचा जीवन गौरव पुरस्कार मिळाला होता.

२००४ ते २००९ या काळात त्यांनी लोकसभेत बिकानेर मतदारसंघाचं प्रतिनिधित्व केलं. त्यांना पद्मभूषण सन्मानानं गौरवण्यात आलं होतं.

अतिशय लोकप्रिय अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनानं भारतीय चित्रपटसृष्टीचं मोठं नुकसान झालं आहे. कलाकारांच्या अनेक पिढ्यांनी त्यांच्याकडून प्रेरणा घेतली होती, घेत राहतील, या शब्दात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना आदरांजली अर्पण केली. धर्मेंद्र यांच्या निधनामुळे हिंदी चित्रपटसृष्टीतल्या एका महान पर्वाचा अंत झाल्याची शोकभावना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी धर्मेंद्र यांना आदरांजली वाहिली आहे.

**होल्ड.. बाईट - नितीन गडकरी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आपल्या समाज माध्यमावर धर्मेंद्र यांना आदरांजली वाहिली आहे. भारतीय चित्रपटसृष्टीचा सुवर्णकाळ गाजवणारा लखलखता तारा निखळल्याची शोकभावना फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

१९६०च्या दशकात भारतीय सिनेसृष्टीत पदार्पण करून भारतीय प्रेक्षकांची मन जिंकणाऱ्या सिनेसृष्टीच्या धरम पाजी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो, असं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. भारतीय सिनेजगताने आज एक लखलखता तारा गमावल्याची भावना काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आपल्या

शोकसंदेशात व्यक्त केली आहे. अभिनेता अक्षय कुमार, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विविध मान्यवरांनीही धर्मेंद्र यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

<><><><><>

गोव्यात सुरू असलेल्या ५६व्या इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज बालपणाच्या विविध छटा आणि संघर्षाविषयीचे विविध चित्रपट दाखवण्यासाठी युनिसेफ अर्थात संयुक्त राष्ट्र बालनिधीबरोबर भागीदारी केली आहे. मुलांचे प्रश्न, आव्हानं आणि संधी यांची मांडणी करण्यासाठी इफ्फीत पाच चित्रपट दाखवले जात आहेत. हे सर्व चित्रपट भारत, कोसोवो, इजिप्त, दक्षिण कोरिया अशा विविध देशांचे असून यांमुळे प्रेक्षकांना सांस्कृतिक सीमा ओलांडून लहान मुलांचं जग अनुभवता येईल, असं मनोगत युनिसेफच्या भारतातल्या प्रतिनिधी सिंथिया मॅककॅफ्रे यांनी व्यक्त केलं.

त्याशिवाय इफ्फी महोत्सवात आज एआय हॅकेथॉनचं आयोजन करण्यात आलं आहे. इफ्फीच्या इतिहासात प्रथमच अशा उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं असून, चित्रपट क्षेत्रातील तज्ज्ञ आणि तंत्रज्ञान तज्ज्ञ एकत्र येऊन नावीन्यपूर्ण एआय-आधारित प्रणाली तयार करणार आहेत. दरम्यान वेव्हज फिल्म बाजार सध्या चित्रपट निर्माते आणि कलाकारांच्या आकर्षणाचं केंद्र आहे. आज या सोहळ्यात 'फ्यूम ओ मोर्टे' हा चित्रपट दाखविण्यात येणार आहे, आज प्रदर्शित होणारा पहिला जपानी चित्रपट 'टू स्ट्रेंजर्स, टू सीझन्स' आहे. चित्रपट निर्माते आणि संपादक राजू हिरानी आज एडिटिंग या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

//<><><><><>//